# दिवाणी दावा क्रमांक १८६/२०१४ मधील निशाणी ५ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी उपअधिक्षक भूमी अभिलेख, श्रीगोंदा यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात येवुन त्यांच्या मार्फत दावा मिळकतीची मोजणी करणेत येवुन वस्तुस्थीती दर्शक अहवाल सादर करावा यासाठी केला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, दावा मिळकत मौजे पिसोरे बुद्रूक, ता. श्रीगोंदा येथील शेत जमिन. दावा कलम १ गट क्र.१५८ मधील क्षेत्र ७ हेक्टर ८५ आर व दावा कलम २ गट क्र.१५८ पैकी १ हेक्टर २० आर क्षेत्राची सरकारी मोजणी करुन मिळणेसाठी तसेच दावा कलम ३ प्रमाणे ९ आर अतिक्रमण क्षेत्राचा ताबा प्रतिवादी क्र.१ ते ३ कडून मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. दावा कलम २ मध्ये वर्णन केलेली जमीन वादींनी संपुर्ण गटात पश्चिम बाजुने सामाईकामध्ये ८० आर क्षेत्र सन १९९३ साली खरेदी केली व त्यानंतर सन १९९४ मध्ये वादींनी ८० आर क्षेत्रास लागून पुर्व बाजूने सामाईकामध्ये ४० आर क्षेत्र खरेदी केले. त्यामुळे वादींची दावा कलम २ प्रमाणे सलग १ हेक्टर २० आर क्षेत्र मालकी वहिवाटीची जमीन आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा कलम २ मध्ये पुर्व बाजुने असलेला बांध फोडून सुमारे ३ वर्षापासून सतत अतिक्रमण केले. म्हणून दावा मिळकतीची मोजणी करण्यात येवुन हददीच्या खुणा कायम करण्यासाठी वादींनी दावा केला आहे.

३. प्रतिवादी क्र.१, ७ ते १० दाव्यात हजर होवून देखिल त्यांनी त्यांचे म्हणणे सादर केले नाही, म्हणून त्यांचेविरुध्द दावा विनाम्हणणे पुढे चालला. प्रतिवादी क्र.२ ते ६ हे या दाव्यात हजर झालेले नाही. त्यामुळे दावा त्यांचेविरुध्द एकतर्फा चालवण्यात येत आहे.

४. दाव्यातील कागदपत्राचे व अर्जाचे काळजीपुर्वक अवलोकन केले.

५. वादी तर्फे त्याचे सुविद्य विधीज्ञ श्री.एस.डी.बोरुडे यांचा युक्तिवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम ९ नुसार स्थानिक अन्वेषन करण्याकरीता न्यायालयास आयोगपत्र काढणेचे अधिकार आहेत. प्रस्तुतचा दावा हा मोजणी व हददीच्या खुणा करुन मिळणेसाठी तसेच अतिक्रमण क्षेत्राचा ताबा मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे या दाव्यात उप-अधिक्षक भूमी अभिलेख श्रीगोंदा यांच्याकडून दावा मिळकतीची मोजणी होउन अंतर्गत हिस्स्यांच्या खुणा दर्शवणारा नकाशा जर अभिलेखावर आला तर दाव्यातील वादग्रस्त बाबींवर आधिक प्रकाश पडेल. त्यामुळे अशा परिस्थितीत कोर्ट कमिशनर मार्फत दावा मिळकतीची मोजणी होउन वस्तुस्थिती दर्शक अहवाल नकाशासह न्यायदानाच्या हितासाठी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ वादींचा नि.५ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ उप-अधिक्षक, भुमि अभिलेख, श्रीगोंदा यांना कोर्ट कमिशनर म्हणुन नेमण्यात येते. त्यांनी कमिशनपुर्व नोटीसा सर्व संबंधितांना काढुन दावा मिळकत मौजे श्रीगोंदा येथील दावा कलम १ व २ मधील मिळकतींच्या वादींच्या व प्रतिवादींच्या संपुर्ण क्षेत्राच्या अंतर्गत हद्दीच्या खुणा कायम करुन, त्याबाबतचा अहवाल नकाशासह दाखल करावा. जर काही अतिक्रमण असल्यास स्वतंत्रपणे नकाशात दर्शवावे.

३ या कामी होणारी कमिशनची फी वादीने उप-अधिक्षक, भुमि अभिलेख श्रीगोंदा यांच्या कार्यालयात परस्पर हा आदेश झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत जमा करावी. त्याकरीता या आदेशाची प्रमाणितप्रत वादीने सादर करावी. वेगळी यादी पाठविली जाणार नाही याची उप -अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, श्रीगोंदा यांनी नोंद घ्यावी.

४ पुढील तारखेस वादीने कमिशन फी भरलेबाबत व योग्य ती कागदपत्रे उप - अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे जमा केल्याबाबत शपथपत्र दाखल करावे.

५ वादीने कमिशन फि भरल्यापासुन ३ महिन्याच्या आत उप- अधिक्षक, भुमि अभिलेख श्रीगोंदा यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दीच्या खुणा कायम कराव्या. त्यानंतर ३० दिवसाच्या आत मोजणीचा अहवाल नकाशासह या न्यायालयात सादर करावा.

६ या आदेशाचे लेखन खुल्या न्यायालयात निवेदीत करुन आदेश घोषीत केला.

दिनांक -२८/१२/२०१५

**(सौ.व्ही.बी.पाटील )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
श्रीगोंदा.